


**ISSN Print:** 2394-7500
**ISSN Online:** 2394-5869
**Impact Factor:** 5.2
IJAR 2019; 5(12): 319-321
www.allresearchjournal.com
Received: 24-10-2019
Accepted: 28-11-2019

**डॉ. के.बी. गिरासे**
सहयोगी प्राध्यापक, ग.तु. पाटील महाविद्यालय, नंदुरबार, महाराष्ट्र, भारत।

**Correspondence Author:**
**डॉ. के.बी. गिरासे**
सहयोगी प्राध्यापक, ग.तु. पाटील महाविद्यालय, नंदुरबार, महाराष्ट्र, भारत।

# ग्रामीण कृषी पतपुरवठ्यात भारतातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांची भूमिका

**डॉ. के.बी. गिरासे**

**सारांष**
शेतकऱ्यांना योग्य वेळी अर्थपुरवठा झाला तरच ते कृषी उत्पादनात वाढ करू शकतील. मात्र असे निदर्शनास येते की, सरकारने राष्ट्रीयकृत बॅकांना आदेश देऊनही कृषी कर्ज देण्यास टाळाटाळ केली जाते. परिणामी ग्रामीण शेतकऱ्यांना मशागतीच्या वेळी आवश्यक असलेले भांडवल प्राप्त होऊ शकत नाही. प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था सहकारी त्रि–स्तरीय रचनेच्या सर्वात खालच्या स्तरावर ग्रामीण भागात कार्य करतात. गावातील 10 किंवा अधिक व्यक्ती एकत्र येऊन या सहककारी पतसंस्थेची स्थापना करू शकतात. गरीब शेतकऱ्यांना पतसंस्थेचे सभासद होता यावे यासाठी सदस्यत्व शुल्क किंवा प्रवेश शुल्क नाममात्र ठेवले जाते. या संस्था अमर्यादित जबाबदारीच्या तत्त्वावर स्थापन केल्या जातात. म्हणजेच संस्था अपयशी ठरल्यास तिची देणी देण्याची पूर्ण जबाबदारी सदस्यांवर असते. ही संस्था प्रत्येक्ष ग्रामीण जनतेच्या संपर्कात येते. त्यांच्या ठेवी स्वीकारते व त्यांना कर्ज देते. कर्जे मुख्यतः अल्प मुदतीचे व मुख्यतः कृषीसाठी दिले जाते. मात्र शेतकरी सावकाराच्या तावडीत सापडू नये म्हणून खावटी कर्जही दिली जातात. ही संस्था ग्रामीण शेतकरी व दुसऱ्या बाजूला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक यांच्यात दुव्याचे काम करते।

**मूल शब्दः** सभासद संख्या, कर्जदार, राखीव निधी वाटप केलेले कर्ज, थकीत कर्ज

**प्रस्तावना**
प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था ग्रामीण भागातील सर्वसामान्य गरजू शेतकरी सभासदांना कर्जपुरवठा करण्याची महत्वाची भूमिका पार पाडतांना दिसतात. कमी व्याजदराने प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था शेतकऱ्यांना पीक कर्ज, जामीन कर्ज, पीक विमा, शेती अवजारांसाठी कर्ज, बी–बीयाणासाठी कर्ज इत्यादि स्वरूपात अल्प व्याजदराने कर्ज पुरवठा करून ग्रामीण शेतकऱ्यांना एकप्रकारे सर्वांगीण विकास साधण्यासाठी महत्वाची भूमिका प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था करतांना दिसतात. शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्याच्या दृष्टीने प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था सर्वात उपयुक्त समजल्या गेलेल्या आहेत. भारतात 1904 यावर्षी प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थेच्या स्थापनेने सहकारी चळवळ सुरू झाली. पूर्वीच्या मुंबई प्रांतात कांगिलहाल खेड्यात 1905 यावर्षी पहिली ग्रामीण पतपुरवठा संस्था स्थापन करण्यात आली होती. भारतात 2013–14 यावर्षी सरासरी सात गावांस एक प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था होत्या. हे प्रमाण 7:1 होते. तर 2017–18 यावर्षी 8:1 होते. भारतात 2013–14 यावर्षी एकुण 93042 एवढ्या प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था होत्या. तर 2017–18 यावर्षी यावर्षी पतपुरवठा संस्थांची संख्या 95238 एवढी होती. 2013–14 ते 2017–18 या पाच वर्षाच्या कालावधीत फक्त 2196 एवढ्या प्राथमिक कृषी सहकारी संस्थांच्या संख्येत वाढ झाली होती. या संस्था देशातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना कृषीसाठी लागणाऱ्या पतपुरवठा करणारी ही एक महत्वाची संस्था आहे।

**संषोधन पध्दती**
सदर पेपर तयार करतांना महाराष्ट्र सहकार आयुक्त आणि निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे व नॅशनल फेडरेशन ऑफ स्टेट को–ऑपरेटीव्ह बॅक ली. मुंबई यांनी प्रकाशित केलेल्या माहितीचा आणि आकडेवारीचा उपयोग करण्यात आला आहे. तसेच लेख, वर्तमानपत्रे आणि विषयाशी संबंधित पुस्तकांचाही दुय्यम माहितीसाठी उपयोग करण्यात आला आहे. सदर पेपर हा दुय्यम माहितीवरून तयार करण्यात आला. संकलित केलेल्या माहितीवरून अध्ययनकर्ताने स्वतः आकडेवारीचे वर्गीकरण व विश्लेषण करून कोष्टक तयार केले आहे. संदर्भ वर्ष म्हणून 2013–14 ते 2017–18 या पाच वर्षाच्या

कालावधीचा आधार घेतला आहे. मुख्यत्वेकरून प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचे अध्ययन करण्यात येईल।

**निष्पत्ती व चर्चा:**
ग्रामीण शेतकऱ्यांसाठी प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था या वरदान ठरलेल्या आहेत. भारतातील संपूर्ण पतपुरवठा रचना प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या पायावर उभारलेली आहे. या संस्थांनी ग्रामीण शेतकरी सभासदांना 2013–14 ते 2017–18 या पाच वर्षाच्या कालावधीत केलेला पतपुरवठा, एकूण सभासद, संस्थांचे एकूण भाग भांडवल, राखीव निधी, एकूण ठेवी, एकूण कर्जाची मागणी व वाटप केलेले एकूण कर्ज व थकीत कर्ज अशा अनेक घटकांवर प्रकाश टाकण्यांचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर अध्ययन कालावधीत या संस्थांच्या अंतर्गत जोडली गेलेल्या गावांची संख्या व त्याची टक्केवारी याचाही समावेश अध्ययनात केलेला आहे. पुढील सारणीवरून संकलित केलेल्या तथ्यांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे।

**सारणी 1:** प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचे आर्थिक वर्गीकरण

| पतपुरवठा संस्थांची माहिती | 2013&14 | 2014&15 | 2015&16 | 2016&17 | 2017&18 |
|---|---|---|---|---|---|
| पतपुरवठा संस्थांची संख्या | 93042 | 92789 | 93367 | 95595 | 95238 |
| एकूण सभासद (हजारात) | 130120 | 121088 | 127322 | 131235 | 130547 |
| एकूण कर्जदारांची संख्या (हजारात) | 48081 | 49858 | 46214 | 52017 | 50690 |
| एकूण भाग भांडवल (कोटीमध्ये) | 9789 | 11068 | 12281 | 14122 | 14142 |
| एकूण राखीव निधी (कोटीमध्ये) | 9135 | 10607 | 12162 | 18860 | 16800 |
| एकूण ठेवी (कोटीमध्ये) | 81895 | 84616 | 101065 | 115884 | 119632 |
| एकूण कर्ज (कोटीमध्ये) | 95836 | 99980 | 112690 | 124831 | 128333 |
| एकूण खेळते भांडवल (कोटीमध्ये) | 212429 | 223711 | 201304 | 239967 | 243563 |
| एकूण वाटप कर्ज (कोटीमध्ये) | 171420 | 159050 | 180824 | 200678 | 207322 |
| एकूण येणे कर्ज (कोटीमध्ये) | 130054 | 147226 | 158487 | 170459 | 169630 |
| एकूण कर्जाची मागणी (कोटीमध्ये) | 155853 | 159626 | 169783 | 200464 | 196750 |
| एकूण वसुल कर्ज (कोटीमध्ये) | 126221 | 123835 | 139894 | 147171 | 148834 |
| एकूण थकीत कर्ज (कोटीमध्ये) | 29632 | 35791 | 29889 | 53293 | 47915 |

Source – National Feederaation of State Co-operative Bank Ltd. Mumbai.

**सारणी 2:** प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांषी जोडलेली एकूण गावे व टककेवारी

| वर्ष | एकूण गावांची संख्या | प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांनी जोडली गेलेली गावे | प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांनी जोडली गेलेली गावांची एकुणाषी टककेवारी |
|---|---|---|---|
| 2013&14 | 696879 | 664312 | 95-33 |
| 2014&15 | 667692 | 629798 | 94-32 |
| 2015&16 | 794840 | 585453 | 73-66 |
| 2016&17 | 758597 | 604888 | 79-74 |
| 2017&18 | 751621 | 639342 | 85-06 |

Source – National Feederaation of State Co-operative Bank Ltd. Mumbai.

सारणीवरून असे निदर्शनास येते की, 2013–14 ते 2017–18 या पाच वर्षाच्या अध्ययन कालावधीत प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या संख्येमध्ये वाढ झालेली आहे. ही वाढ जवळ जवळ 2196 संस्थांची होती. असे असले तरी या कालावधीत फक्त 427 हजार सभासद वाढले आहेत. अध्ययन कालावधीत पतपुरवठा संस्थांच्या कर्जदारांच्या संख्येत 2609 हजार एवढी वाढ झाली असून एकूण भाग भांडवलात 4353 कोटी रूपये एवढी वाढ झालेली दिसून येते. पत संस्थांच्या राखीव निधीत पाच वर्षाच्या कालावधीत बऱ्यापैकी वाढ झालेली दिसून येते. अध्ययन कालावधीत राखीव निधीत 7665 हजार कोटी रूपयांची वाढ झालेली दिसून येते.
प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या ठेवीतही नोंदणीय वाढ झालेली दिसून येते. पतपुरवठा संस्थांच्या 2013–14 यावर्षी एकूण 81895 हजार कोटी रूपये एवढ्या ठेवी होत्या. त्यात वाढ होऊ 2018–19 यावर्षी 119632 हजार कोटी रूपये एवढी वाढ झालेली होती. ही वाढ अध्ययन कालावधीत 37737 हजार कोटी रूपये एवढी होती. पतपुरवठा संस्थांनी दिलेल्या कर्जातही अध्ययन कालावधीत भरीव वाढ झालेली दिसून येते. पाच वर्षातील ही वाढ 32497 हजार कोटी रूपये एवढी होती. पाच वर्षाच्या कालावधीत पतपुरवठा संस्थांच्या खेळत्या भांडवलातही वाढ झालेली आहे. पतपुरवठा संस्थांकडून 2013–14 ते 2017–2018 या कालावधीत कर्जाच्या मागणी पेक्षा कर्जाचे वाटप जास्त झालेले दिसून येते. याचाच अर्थ ग्रामीण शेतकऱ्यांची पतपुरवठ्यांची गरज या संस्था पूर्ण करीत आहेत. एकूण वाटप कर्ज व एकूण येणे कर्ज यात प्रत्येक वर्षी वाढ झालेली होती. वसूल कर्जाच्या रक्कमेत वाढ दिसत असली तरी पाच वर्षात येणे कर्जातही वाढ नोंदवली गेलेली होती. 2013–14 यावर्षी पतपुरवठा संस्थांचे थकीत कर्ज 29632 हजार कोटी रूपये होते. थकीत कर्जात पाच वर्षात वाढ होत जाऊन 2017–18 यावर्षी 47915 हजार कोटी रूपये एवढे होते. पतपुरवठा संस्थांच्या थकीत कर्जात होणारी वाढ ही या संस्थांच्या आर्थिक परिस्थिती राखण्यास अयोग्य आहे.
सारणी क्र. 2 वरून असे निदर्षनास येते की, 2013–14 यावर्षी एकूण गावांपैकी 95.33 टक्के गावे या संस्थांशी जोडली गेली होती. नंतरच्या वर्षात अनुक्रमे 2014–15 यावर्षी 94.32 टक्के, 2015–16 यावर्षी 73.66 टक्के, 2016–17 यावर्षी 79.74 टक्के व 2017–18 यावर्षी 85.06 टक्के गावे या पतपुरवठा संस्थांशी जोडली गेलेली होती.

**निष्कर्ष:**
1. प्राथमिककृषी सहकारी पतपुरवठा संस्थांची संख्येत अध्ययन कालावधीत वाढझालेली होती. असे असले तरी 2013–14 ते 2014–15 या एका वर्षाच्या कालावधीत वार्षिक वृध्दी दर वजा 0.27 टक्के होता. म्हणजेच या एका वर्षाच्या कालावधीत पतपुरवठा संस्थांच्या संख्येत घट झालेली होती.
2. 2013–14 ते 2017–18 या पाच वर्षाच्या अध्ययन कालावधीत पतपुरवठा संस्थांची संख्या स्थिर राहिली नसून प्रत्येक वर्षी कमी जास्त झालेली होती. पतपुरवठा संस्थांमध्ये झालेली वाढ याचे अध्ययन करता असे दिसून येते की, 2013–14 च्या तुलनेत अनुक्रमे 2014–15 यावर्षी 0.27 टक्के घट, 2015–16 यावर्षी 0.17 टक्के वाढ, 2016–17 यावर्षी 0.91 टक्के वाढ तर 2013–14 ते 2017–18 या पाच वर्षात 0.68 टक्के वाढझालेली होती.

3. पतपुरवठा संस्थांच्या एकूण सभासद संख्येतही पाच वर्षात प्रत्येक वर्षी वाढ व घट झालेली दिसून येते. 2013–14 ते 2017–18 या अध्ययन कालावधीत पतपुरवठा संस्थांच्या सभासद संख्येत वार्षिक वाढ फारच अल्प प्रमाणात झाली होती. फक्त 0.08 टक्के होती.
4. अध्ययन कालावधीत पतपुरवठा संस्थांच्या कर्जदारांचा संख्येत प्रत्येक वर्षी वाढ–घट नोंदवली गेली होती. 2013–14 ते 2017–18 या अध्ययन कालावधीत पतपुरवठा संस्थांच्या कर्जदारांच्या संख्येत वार्षिक सरासरी वाढ 1.33 टक्के होती.
5. पतपुरवठा संस्थांच्या एकूण भागभांडवलात 2013–14 ते 2017–18 या दरम्यान प्रत्येक वर्षी वाढझालेली दिसून येते. परंतु ही वाढ फारच संथ गतीने झालेली होती. 2013–14 ते 2017–18 या कालावधीत पतपुरवठा संस्थांच्या भागभांडवलात वार्षिक सरासरी झालेली वाढ 9.63 टक्के होती.
6. 2013–14 ते 2017–18 या पाच वर्षाच्या अध्ययन कालावधीत पतपुरवठा संस्थांच्या राखीव निधीत उल्लेखनीय वाढझालेली होती. या कालावधीत राखीव निधीत प्रत्येक वर्षी वृध्दी झालेली होती. 2013–14 ते 2017–18 या कालावधीत दरम्यान पतपुरवठा संस्थांच्या राखीव निधीत वार्षिक सरासरी झालेली वाढ ही 16.45 टक्के होती.
7. कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांची आर्थिक परिस्थिती प्राप्त केलेल्या ठेवींवर अवलंबुन असते. अध्ययन कालावधीत या संस्थांच्या ठेवी प्रत्येक वर्षी वाढल्या आहेत. 2013–14 या वर्षी संस्थांकडे 81895 हजार रूपये कोटीच्या ठेवी होत्या. त्यात वाढ होऊन 2017–18 यावर्षी 119632 हजार रूपये कोटी पर्यंत पोहचल्या. वार्षिक सरासरी वाढ ही 9.94 टक्के होती.
8. पतपुरवठा संस्थांचे अध्ययन कालावधीतील 2013–14 यावर्षी 95836 हजार कोटी रूपये एकूण कर्ज होते. त्यात वाढ होऊन 2017–18 यावर्षी 128333 हजार कोटी रूपये झालेले होते. वार्षिक सरासरी वाढ ही 7.57 टक्के होती.
9. पतपुरवठा संस्थांच्या एकूण खेळत्या भांडवलात पाच वर्षात 2015–16 यावर्षी घट नोंदवली गेली होती. अध्ययन कालावधीतील चार वर्ष एकूण खेळत्या भांडवलात वाढझालेली होती. 2013–14 ते 2017–18 या पाच वर्षाच्या अध्ययन कालावधीत पतपुरवठा संस्थांच्या खेळत्या भांडवलात वार्षिक सरासरी वाढ ही 3.48 टक्के एवढी होती.
10. 2014–15 या वर्षाचा अपवाद सोडता तर पतपुरवठा संस्थांनी एकूण वाटप केलेल्या कर्जात वाढझालेली होती. 2013–14 यावर्षी 171420 हजार कोटी रूपये कर्ज वाटप केले होते. तर 2017–18 यावर्षी एकूण वाटप केलेले कर्ज 207322 हजार कोटी रूपये होते. पतपुरवठा संस्थांकडून वाटप झालेल्या कर्जात अध्ययन कालावधीत दरवर्षी सरासरी वाढ 4.87 टक्के एवढी होती.
11. पतपुरवठा संस्थांचे एकूण येणे कर्ज पाहता असे निदर्शनास येते की, येणे कर्जात चार वर्ष सतत वाढ झालेली होती. मात्र 2017–18 यावर्षी येणे कर्जात घट झालेली दिसून येते. पाच वर्षांच्या अध्ययन कालावधीत पतपुरवठा संस्थांच्या येणे कर्जात वार्षिक सरासरी झालेली वाढ 8.87 टक्के एवढी होती.
12. 2017–18 या वर्षाचा अपवाद सोडता पतपुरवठा संस्थांकडून 2013–14 ते 2016–17 या कालावधीत एकूण मागणी केलेल्या एकूण कर्जात वार्षिक सरासरी झालेली वाढ ही 6.00 टक्के एवढी होती.
13. पतपुरवठा संस्थांनी वाटप केलेल्या कर्जातून या संस्थांकडून वसूल करण्यात आलेल्या कर्जाचे अवलोकन करता असे निदर्शनास येते की, पाच वर्षाच्या अध्ययन कालावधीत वसूल झालेल्या कर्जात वार्षिक सरासरी वाढ 4.21 टक्के एवढी राहीली होती.
14. थकीत कजर्ज ही पतपुरवठा संस्थांनी नेहमीची समस्या राहिली आहे. 2013–14 ते 2017–18 या पाच वर्षाच्या अध्ययन कालावधीत 2013–14 यावर्षी पतपुरवठा संस्थांचे एकूण थकित कर्ज 29632 हजार कोटी रूपये एवढे होते. त्यात अध्ययन कालावधीत 2017–18 यावर्षी 47915 हजार कोटी रूपये एवढी मोठी वाढझालेली होती. अध्ययन कालावधीत वार्षिक सरासरी वाढ 12.47 टक्के एवढी होती.

## संदर्भ


1. Anwar Iqbal Qureshi, The future of the Co-operative movement in India, Oxford University Press, Madras, 1947, pp.3-4.
2. Datta S.K. – “Cooperative societies and Rural Development”, Mittal Publication, New Delhi, 1991.
3. Madan, G.R., Co-operative Movement in India, Mittal Publications, New Delhi, 1994.
4. Madhur B.S. – Co-operation in India, Sahitya Bhuvan, Agra.
5. Misra and Puri, India Economy, Himalaya Publishing House, 28th revised eedition and updated edition 2010.
6. Naik K.N – The co-operative moment in the Bombay State.
7. Pratapsing – Co-operative Agricultural Finance, National Book Organization, Delhi.
8. गायकवाड बी.आर. – जालना जिल्ह्यातील सहकारी पतपुरवठ्यच्या (1985 नंतर) चिकित्सक अभ्यास, पीएच.डी. प्रबंध डॉ.बाबासाहेब मराठवाडा, औरंगाबाद विद्यापीठ, 1990.
9. सोवणी सदाशिव विनायक – ग्रामीण आर्थिक विकासात प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांचा सहभाग (पुणे जिल्ह्याचा नमूना अभ्यास) पीएच.डी. प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, 2011.
10. 10½ www.nafscob.org.